
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय चौथा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

# भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

## अध्याय चौथा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)


२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

**श्री विजय पांढरे**

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com



ई प्रकाशन :

**ई साहित्य प्रतिष्ठान®**

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख



©श्री विजय पांढरे(२०१२)



**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**



प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

॥ ॐ परमात्मने नम: ॥

अध्याय चवथा

# ज्ञानसंन्यासयोग

पहा कान तृप्त झाले । गीतारहस्य ऐकले । मनीचे स्वप्न पूर्ण झाले । आज देवा ॥१॥
प्रज्ञा विवेकाचे ज्ञान । प्रतिपादे तो श्रीकृष्ण । आणि भक्तराज अर्जुन । श्रोता असे ॥२॥
पंचमाचा तो आलाप । त्यात सुगंध अमुप । आणि चव ती अप्रूप । एकत्र तेथे ॥३॥
कैसी आगळीक दैवाची । जे गंगा जोडली अमृताची । जप तपे श्रोतियांची । फळा आली ॥४॥
सर्वेंद्रियांचे करून कान । आता करावे तुम्ही श्रवण । अलौकिक ते ज्ञान । प्रकटेल येथे ॥५॥
या ज्ञानदान प्रसंगे । उपदेश श्रीकृष्ण सांगे । होऊनिया जागे । ऐका तुम्ही ॥६॥
त्या वेळी संजय राजासी म्हणे । अर्जुन युक्त असे दैवगुणे । म्हणून त्या नारायणे । कृपा केली ॥७॥
जे न सांगितले पित्याला । वा न कथिले मातेला । ते सांगतसे अर्जुनाला । आज येथे ॥८॥
राधेशी केवढी जवळीक । ती ही न देखे हे प्रेमसुख । हा उपदेश आध्यात्मिक । न ठाऊक तिजला ॥९॥
सनकादिकांच्या आशा । वाढल्या होत्या खूपशा । परी ही ज्ञान दशा । त्यांना नाही ॥१०॥
या जगदीश्वराचे प्रेम । एथ दिसतसे निरूपम । पार्था जाणून सर्वोत्तम । कथन केले ॥११॥
पाहून अर्जुनाची प्रीत । अमूर्त झाला मूर्त । आणि असे उपदेशीत । ज्ञान तया ॥१२॥
योग्यांना हा सापडेना । वेदांनाही तो कळेना । ध्यानी जना आकळेना । हा कदापि ॥१३॥
तो हा निजस्वरूप । अनादि जो निष्कंप । प्रकटला तो अनुप । अर्जुनासाठी ॥१४॥
जो निर्गुण निराकार । होऊन तो सगुण साकार । रूप घेऊन ते सुंदर । प्रकटला येथे ॥१५॥

श्री भगवानुवाच

श्रीकृष्ण म्हणे अर्जुनाला । योग मी सांगितला सूर्याला । परंतु या गोष्टीला । काळ खूप झाला ॥१६॥
मग तो सूर्य जो रवी । त्याने योगस्थिती ही आघवी । निरुपली बरवी । मनुप्रती ॥१७॥
मनुने आपण अनुष्ठिली । मग ईक्ष्वाकुवा उपदेशिली । ऐसी परंपरा विस्तारली । पुढे अर्जुना ॥१८॥
परंपरेने मग राजघराणी । जाणले अनेक राजांनी । परंतु आता कोणी । जाणतीच ना ॥१९॥
कामनासक्त झाले नर । इंद्रिय भोगावर भर । म्हणून पडला विसर । आत्मबोधाचा ॥२०॥
ऐसे आत्मबोध संपता । वाढते विषय लोलुपता । भासता ती अहंकारता । लोपले ज्ञान ॥२१॥
दिगंबरांच्या गावी । वस्त्रे काय करावी । जन्मांधासी रवी । काय कामाचा ॥२२॥
बहिऱ्यासमोर गाणे । तेथे कैसे मान डोलावणे । कोल्ह्यासी का चांदणे । आवडते कधी ॥२३॥
चंद्र उगवता नभाते । कावळ्यांची दृष्टी जाते । मग कावळे चंद्राते । ओळखतील कसे ॥२४॥
मनी वैराग्य नसता । विवेकाची भाषा न जाणता । मग आत्मतत्त्वाची प्राप्तता । होईच ना ॥२५॥
अहंकाराने वेढले । मोह अज्ञान वाढले । ऐसे योगज्ञान लोपले । या जगती ॥२६॥
तोच योग आता । तुला सांगितला कुंतीसुता । जाणता तो तत्त्वता । संपे भ्रांती ॥२७॥
अर्जुना तू प्रिय मजला । जाणून या योगाला । आचर तू स्वधर्माला । आज येथे ॥२८॥
तू प्रेमाचा पुतळा । तू भक्तीचा जिव्हाळा । चैतन्याची ती कळा । तुजठायी अर्जुना ॥२९॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तू मित्र माझा जवळचा । आज प्रसंग युद्धाचा । म्हणून उपदेश योगाचा । केला तुजला ॥३०॥
योगास या जाणून । निजबोध मनी पावून । संपू दे तुझे अज्ञान । आधी अर्जुना ॥३१॥

- अर्जुन उवाच -

तेव्हा म्हणाला अर्जुन । मातेने बाळा प्रेम करणं । त्यात काय नवीन । आहे देवा ॥३२॥
देवा तू दु:खितांची सावली । तू अनाथ जिवांची माऊली । आम्हावर कृपा झाली । तुझीच देवा ॥३३॥
पोटी जरी पांगळा आला । मातेने का कधी अव्हेर केला । तसा आधार तो आम्हाला । तुझा देवा ॥३४॥
आता मी जे विचारेन । ऐक तू लक्ष देऊन । नकोस जाऊ बा चिडून । माझीया बोला ॥३५॥
आता जे तू सांगितले । ते सर्व मी ऐकले । परि न ते पटले । माझीया चित्ता ॥३६॥
तो रवी विवस्वतु कोण । आम्हा नाही काही जाण । तया तू उपदेश देणं । न पटे मजला ॥३७॥
आपला जन्म आताचा । सूर्य अति प्राचीन काळाचा । त्यास उपदेश योगाचा । केला कसा ॥३८॥
चरित्र तुझे अलौकिक । मज न ते ठाऊक । म्हणून ही आगळीक । करतो देवा ॥३९॥
तुझे त्या काळी असणे । आणि योग तो उपदेशणे । सांग मज विस्ताराने । आता देवा ॥४०॥

- श्री भगवानुवाच -

तुज ऐसे ते वाटणे । जे काळी विवस्वानाचे असणे । तेधवा तुझे माझे नसणे । ती भ्रांती अर्जुना ॥४१॥
हे बघ अर्जुना । जन्म जाहले आपले नाना । मी जाणतो त्या सर्वांना । परि तुवा विस्मरण ॥४२॥
मी जेणे जेणे अवसरे । जे जे होऊन अवतरे । ते समस्तही स्मरे । मज धनुर्धरा ॥४३॥
म्हणोनी हे आघवे । मागील मज आठवे । माझे ते प्रकटन संभवे । प्रकृतियोगे ॥४४॥
मी तत्त्व ते चिरंतन । मज ठायी भासे जन्ममरण । घडे सर्व मायाकारण । माझेच ठायी ॥४५॥
भ्रांती बुद्धीकारणे । माझे कर्माधीन वाटणे । परि मी नांदे स्वतंत्रपणे । सर्वकाळ ॥४६॥
आरशात ते पाहता । द्वैताची ती भासमानता । परि सर्व काही तत्त्वत: । एकचि असे ॥४७॥
तसा मी निराकार निर्गुण । परी घडतसे माझे प्रकटन । करुन प्रकृतीस अधिष्ठान । प्रकटन माझे ॥४८॥
होतो जेधवा धर्म शक्तिहीन । नि अधर्म होतो बलवान । करण्या अधर्माचे उच्चाटन । प्रकटतो मी ॥४९॥
जन्मरहितपणा विसरून । अव्यक्तपणा दूर सारून । करण्या धर्माचे रक्षण । अवतार माझा ॥५०॥
माझ्या करुणेकारणे । माझे साकार होऊन अवतरणे । मग अंधार अज्ञानाचे संपणे । आपोआप ॥५१॥
अधर्माचा करून नाश । दोषांचे ते तोडून पाश । करतो सत्याचा उद्‌घोष । सज्जनांकरवी ॥५२॥
अधर्म तो संपवून । धर्म तो स्थापून । धर्मनीतीचे मीलन । घडवतो मी ॥५३॥
अज्ञानाचे आवरण तोडून । विवेकाचा दीप उजळून । योग्यांसी बा आत्मज्ञान । माझेच कारणे ॥५४॥
जाणून ते आत्मस्वरूप । योगी होती विश्वरूप । मग सात्त्विकता अमाप । वाढे जगती ॥५५॥
ऐसे पाप ते संपते । पुण्य ते वाढते । जेधवा ती प्रकटते । मूर्ती माझी ॥५६॥
होण्या जगाचे कल्याण । घडे माझे ते प्रकटन । परि याची ती जाण । केवळ ज्ञानियांसी ॥५७॥
माझे अजन्मा असून जन्मणे । अक्रिय असूनही कर्म करणे । अविकारी असून विकारणे । ज्ञानी जाणती ॥५८॥
मजसी ऐसे जाणता । घडतसे परममुक्तता । मग घडे माझेठायी एकरूपता । निधनसमयी ॥५९॥
जे मी-तूपणा सोडती । कामनाशून्य होती । इच्छांची संपता गती । ज्ञान होते ॥६०॥
माझे अस्तित्व चिरंतन । जयाठायी सर्व इच्छांची बोळवण । तया होतसे आत्मज्ञान । आपोआप ॥६१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

निष्काम मनाकारण । घडे स्वस्वरूपास जाणणं । तेचि बा आत्मज्ञान । अर्जुना माझ्या ॥६२॥
मजसी एकरूप होता । मीच होती ते तत्त्वत: । मग अनादि ती द्वैतता । फिटून जाई ॥६३॥
संपून पृथक्तेची जाण । वैश्विक चैतन्यासी एकरूप होणं । मग संपे जन्ममरण । अर्जुना माझ्या ॥६४॥
यम नियम जाणून । ध्यान समाधी साधून । होता द्वैत निरसन । प्राप्ती माझी ॥६५॥
हे पहा अर्जुना । प्राप्त होऊन ज्ञाना । संपणे मी-तूपणा । तेचि ज्ञान ॥६६॥
जगी भक्तीचा आभास । परि ते अज्ञान खास । मनी असता ती आस । भक्ती कैची ॥६७॥
ऐसे अज्ञाने सर्व नाशिले । जे बुद्धिभेदास आले । तयांनीच कल्पिले । अनेकत्व माझे ॥६८॥
असूनही मी निर्गुण अव्यक्त । मजठायी रूपगुण चिंततात । मग अडकती द्वैत भक्तीत । अज्ञानाकारणे ॥६९॥
मी वैश्विक चैतन्य चिरंतन ।मजठायी अनेकत्व मानणं।माझ्या वैश्विकतेची नसणे जाण ।ते अज्ञान अर्जुना ॥७०॥
ऐसे होऊन भ्रमीत । नाना इच्छा ठेवून मनात । पूजा करती यथोचित । ते अज्ञानी ॥७१॥
मनी जे जे असणे । मग तैसेच ते भासणे । ते मनो संमोहनाकारणे । जाण अर्जुना ॥७२॥
मनी ज्या इच्छा असती । त्या इच्छाकारणेच प्रकटते भ्रांती । कर्मसिद्धांताची महती । हीच अर्जुना ॥७३॥
जैसे जे बीज पेरावे । फल तसेच मग पावावे । हे कार्यकारण आघवे । जाण अंतरी ॥७४॥
जैसे डोंगरकपारी । आपला बोल प्रतिध्वनी करी । तैसी अनुभवांची उभारी । मनामाजी ॥७५॥
या अज्ञानी लोकांच्या भजना । मी साक्षीभूत अर्जुना । ही जी अनुभवाची भावना । ती द्वैतबुद्धी ॥७६॥
ऐसेच तू जाण । बघ चारही हे वर्ण । समस्त जे आकार गुण । ते कर्माकारणे ॥७७॥
ऐसे जे अडकती अज्ञानात । भ्रमता प्रकृती गुणात । मग मला अंतरतात । स्वकर्माकारणे ॥७८॥
मी वैश्विक चैतन्य चिरंतन । येथे जे गुण आकाराचं भासणं । ते समस्त स्वकर्माकारण । जाण अर्जुना ॥७९॥
म्हणून अर्जुना घे तू ध्यानी । हे चार वर्णाचे प्राणी । प्रकटवूनही मज ठिकाणी । मी अकर्ताच ॥८०॥
सर्व मजठायी घडले । परि म्या नाही केले । ऐसे जेणे जाणीतले । तो सुटला गा ॥८१॥
मागील जे मुमुक्षू होते । तयानी ऐसेच जाणोनी माते । कर्मे केली समस्ते । धनुर्धरा ॥८२॥
बीजे जी जाळली जाती । ती पेरूनही न उगवती । तैसे ती कर्मे घडती । ज्ञान्याठायी ॥८३॥
आणि तू जाण अर्जुना । कर्म अकर्म दोहोंना । जाणता कर्मसिद्धांत ज्ञाना । मुक्ती घडे ॥८४॥
काय असे ते कर्म । कशासी म्हणती अकर्म । जाणणे दोहोचे वर्म । ज्ञान अर्जुना ॥८५॥
जैसे ते खोटे नाणे । तयाचे खऱ्यासारखे दिसणे । मग मतीचे ते भ्रमणे । सारखेपणा कारणे ॥८६॥
तैसा भ्रम होई नैष्कर्म्यतेचा । परि डोंगर वाढे कर्माचा । मग फेरा भवचक्राचा । आपोआप ॥८७॥
वाईट ती मूर्खांची गती । परि शब्दपंडित तैसेच असती ।म्हणून कर्माची ही महती ।जाण अर्जुना ॥८८॥
मीपणाचे जे भासणे । तेचि कर्माचे असणे । विश्वाचे ते प्रकटणे । मीपणाठायी ॥८९॥
या मीपणाचे ठिकाणी । सत्त्व-रज-तमाची उगवणी । मग भवचक्राची कहाणी । अखंडित ॥९०॥
कर्म निषिद्धता जाणता । कर्म संपूर्ण ते विझता । प्रकटते स्वस्वरुपता । आपोआप ॥९१॥
एऱ्हवी जग हे कर्माधीन । कर्मव्याप्ती अतिगहन । परि ज्ञान्यांचे ते लक्षण । ऐक आता ॥९२॥
ते अविरत कर्मात वर्ततात । नैष्कर्म्यता आपली जाणतात । न अडकता कर्मफलात । घडे कर्म तेथे ॥९३॥
आपले कर्तव्य करणे । कर्मफली आसक्त न होणे । निष्काम आचरण घडणे । ज्ञान अर्जुना ॥९४॥
ज्ञानी लिप्त कर्मात । परि निष्काम असती अंतरात । ऐसी निष्कामता जीवनात । मुक्ती अर्जुना ॥९५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जैसे जलापाशी उभे ठाकता । दिसते आपलीच प्रतिबिंबता । परि आपली ती अलिप्तता । जाणतो आपण ॥९६॥
जे नावेत प्रवास करती । तया वृक्ष पळताना भासती । वृक्षांची ती असत्य गती । भ्रमा कारणे ॥९७॥
तैसे सर्व कर्माचे असणे । विश्वाचे हे अनित्य भासणे । ते सर्व भ्रमाकारणे । जाणती ज्ञानी ॥९८॥
पृथ्वीच्या फिरण्याकारणे । सूर्याचे उदयास्त भासणे । तैसे कर्माचे ते प्रकटणे । नैष्कर्मते ठायी ॥९९॥
तो शरीरात भासतो । परि तो मुक्त असतो । त्या प्रतिबिंबाजळी दिसतो । भानु जैसा ॥१००॥
तेणे न पाहता विश्व देखिले । न करिता सर्व केले । न भोगिता भोगीले । भोग सर्व ॥१०१॥
जो स्वस्वरूपी जागला । तो स्वयेचि विश्व जाहला । तो जन्ममरणातून सुटला । आपोआप ॥१०२॥
त्या ज्ञान्याच्या ठायी । कर्माचा द्वेष नाही । आणि फल अपेक्षा जराही । नाही तेथे ॥१०३॥
हे कर्म मी हाती घेईन । नि सिद्धीस ते नेईन । ऐशा संकल्पी तयाचे मन । न विटाळे कधी ॥१०४॥
प्राप्त होऊन ज्ञानास । जयाने जाळीले संपूर्ण कर्मास । प्राप्त तो मग ब्रह्ममयतेस । आपोआप ॥१०५॥
शरीरामाजी जो उदास । फलइच्छेची नाही आस । परि मनी नित्य उल्हास । वसे तेथे ॥१०६॥
प्राप्त होऊन आत्मबोधास । मनी नित्य संतोष वास । अहंकाराचा तो भास । नाहीच तेथे ॥१०७॥
सांडोनिया इंद्रिय मन । संपले जयाचे अहंपण । आत्मतत्त्वा अनुभवून । तृप्त तृप्त ॥१०८॥
म्हणोनी अवसरे जे जे पावे । की तेणेच तो सुखावे । जया आपले आणि परावे । दोन्ही नाही ॥१०९॥
तो दिठी जे पाहे । ते आपणचि होऊन जाये । आइके तो आहे । तोचि जाहला ॥११०॥
चरणी तो चाले । मुखे जे जे बोले । इंद्रिय मनी जे जे केले । आपणचि जो ॥१११॥
जे जे विश्व भासते । ते स्ववाचून अन्य नसते । आता कोणतेही कर्म ते । न बाधी तया ॥११२॥
द्वैतभाव जेथे नाही । तेथे मत्सर राहील काई । दुजेभाव तया ठायी । वसेच ना ॥११३॥
म्हणून सदैव तो मुक्त । कर्म करूनही कर्मरहित । सगुण परि गुणातीत । ब्रह्ममय तो ॥११४॥
जरी तो देहधारी दिसे । परि चैतन्यासारखा असे । पाहता परब्रह्माचेनि कसे । परब्रह्म तो ॥११५॥
वरी वरी पाहता । भासे तयाठायी कर्मठता । परि ती कर्मबंधता । नाही तया ॥११६॥
अभ्रे जशी अकालीची । न बरसता हालचाल तयांची । तैशी सकल कर्मांची । गती तेथे ॥११७॥
कर्म घडे तयाठायी । परि तया कर्मबंध नाही । विश्वात्मकतेची ती ग्वाही । अंतरी त्यांच्या ॥११८॥
भाग जरी घेई यज्ञात । परि तो द्वंद्वातीत । ऐसा तो फलेच्छारहित । यज्ञ त्याचा ॥११९॥
तयाचे ते यज्ञ करणे । यज्ञी भोग अर्पणे । अवघे ते मंत्र म्हणणे । ती ब्रह्ममयता ॥१२०॥
सर्व कर्म तयाचे ब्रह्मसमान । बोधा जयाचे मन । निष्कामतेचे ते प्रमाण । तोचि झाला ॥१२१॥
मनाचे अज्ञान गेले । निष्कामतेशी लग्न लागले । उपासनाच ते झाले । जीवन त्याचे ॥१२२॥
गुरुवाक्याशी गाठ पडली । अविद्या ती संपली । निष्कामता ती प्रकटली । जीवनी त्याच्या ॥१२३॥
ऐसा आंतरिक यज्ञ घडता । संपली जयाची अज्ञानता । अनुभवी तो ब्रह्ममयता । सदैव अर्जुना ॥१२४॥
मग प्रारब्धाकारणे । घडे देह तो पाळणे । मन इच्छांचे ते असणे । नसेच तेथे ॥१२५॥
आता अर्जुना सांगेन । कैसे तयाचे ते जीवन । कैसे त्याचे ते आचरण । घडे येथे ॥१२६॥
संयमाचा अग्नी पेटवून । विवेकाचा मंत्र जागवून । इंद्रियभोगाचे करून हवन । विरक्त तो ॥१२७॥
मनी विवेक उगवता । येते आहारविहारी सम्यकता । इंद्रियांची ती कामुकता । विरून जाई ॥१२८॥
विरक्तीची ज्वाला पेटता । संपते विकारांची सघनता । मग प्रकटते ती निष्कामता । आपोआप ॥१२९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

महावाक्य ते कानी पडता । घडतसे ती आत्म्यैक्यता । अहंभावाची ती पृथकता । संपून जाई ॥१३०॥
ऐसे बघ अर्जुना । जाळून सर्व दोषांना । प्राप्त होऊन आत्मज्ञाना । मुक्त तो ॥१३१॥
मन इंद्रियासी सम राहून । विवेकाचे मंथन करून । अंतरी गुरुवाक्य अनुभवून । सुटतो तो ॥१३२॥
ऐसे आत्मनिरीक्षण करता । प्रकटते ती आत्मदिव्यता । द्वैताची ती कथा । संपून जाई ॥१३३॥
ऋद्धिसिद्धीचा मोह सोडणे । मन इंद्रियासी अनासक्त होणे ।मग निष्काम ते होणे । आपोआप ॥१३४॥
मनाचे जे मनपण । तेच गेले विरून । सुटणे त्या मनइच्छेतून । सूत्र अर्जुना ॥१३५॥
अंतरी अवधान यज्ञ पेटवून । अनुभव समीधा त्यात टाकून । सुटे तो अहंभावातून । अवधान योगे ॥१३६॥
अनुभवाचे करता निरीक्षण । विकारांची होते बोळवण । स्वप्न सुषुप्तीस ओलांडून । ज्ञान प्रकटे ॥१३७॥
श्वास मनइंद्रियांची होता सांगता । आत्मतत्त्वी एकत्व पावता । अद्वैत ज्ञान प्रकटता । मुक्ती घडे ॥१३८॥
ऐसे मनइंद्रियास ओलांडून । मन समत्व साधून । आत्मतत्त्वी होता लीन । मोक्षप्राप्ती ॥१३९॥
साधना दिसती अनेक । परि अंती फलप्राप्ती एक । ऐसे साधक जन कित्येक । मुक्ती पावती ॥१४०॥
द्रव्य अर्पिता द्रव्ययज्ञ । देहाधारे तपोयज्ञ । मनाद्वारे योगयज्ञ । सांगितला आहे ॥१४१॥
शब्दाने शब्दाचे पूजन । ते शब्द यज्ञाचे आयोजन । ज्ञाता ज्ञेय संपणं । तो ज्ञान यज्ञ ॥१४२॥
समरस होता आत्मसाधनेत । स्थिर होऊन समतेत । होता मनइंद्रियातीत । योग घडे ॥१४३॥
मनइंद्रिय ती त्यागता । संपते ती अहंकारता । अनुभवांशी तादात्म्य तुटता । आत्मप्राप्ती ॥१४४॥
श्वासोच्छ्वासाचे अवधान ठेवून । मनोविकारांस जाळून । शुद्ध होऊ देणे मन । सूत्र अर्जुना ॥१४५॥
एक आंतरकुंभक करतो । दुजा बर्हि:कुंभक जाणतो । दोहोचा जो अभ्यास तो । प्राणायाम अर्जुना ॥१४६॥
एक वज्रासन करून । मनइंद्रियी सयंमन ठेवून । करता अहंकार निरसन । मोक्षप्राप्ती ॥१४७॥
सकल कामना आणि मन । अवधान यज्ञी करता हवन । मग प्राप्त होते आत्मज्ञान । आपोआप ॥१४८॥
ऐसी अविद्या समूळ जळता । उरते मन निजस्वभावत: । जेथे ज्ञेय आणि ज्ञाता । उरेचिना ॥१४९॥
ऐसा अहंभाव सरता । प्रकटते ती निष्कामता । मग कार्य आणि कर्ता । कैचा तेथे ॥१५०॥
अहंभाव तो संपता । विचारांची होते सांगता । प्रकटते ती निष्कामता । अद्वैताकारणे ॥१५१॥
आत्मतत्त्वी होता लीन । प्रगटते ते अनादि ज्ञान । ब्रह्ममयता ती अनुभवून । तो मुक्त होई ॥१५२॥
ऐसे अहंभावी जे निवाले । जे चिरंतना पावले । ते आपोआप ब्रह्म झाले । अनायासे ॥१५३॥
ज्या मनी न येते विरक्ती । जे इंद्रिय संयमन न करती । जे योगाची कास न धरती । त्यांचा जन्म व्यर्थ ॥१५४॥
जयाचे भौतिक कर्म नीट नाही । कर्मसिद्धांत जे जाणत नाही । परमार्थ तयाठायी । होईल कैसा ॥१५५॥
अशा अनेक त्या साधना । तुला सांगितल्या अर्जुना । गाठ पडता आत्मज्ञाना । मुक्ती घडे ॥१५६॥
ऐसे स्वत:स जाणता । कर्मसिद्धांत उमजता । द्वैत ते सरता । न उरे कर्मबंध ॥१५७॥
स्थूल साधनी अडकता । बहिर्मुख ते वर्तता । आत्मतत्त्वाची वार्ता । मग प्रगटेच ना ॥१५८॥
बहिरंग साधना सोडून । ज्ञान यज्ञाची कास धरून । स्वर्गसुख लाथाडून । मुक्त हो अर्जुना ॥१५९॥
होण्या ते आत्मज्ञान । अर्जुना ठेव तू अवधान । अवधानाचे घालता अंजन । ज्ञान प्रकटे ॥१६०॥
होण्या तू आत्मज्ञान । निष्कामता अंगी बाण । कर्माचे डोंगर वाढवणं । अज्ञान अर्जुना ॥१६१॥
कर्मप्रवृत्ती निरसता । तर्काची संपते सत्ता । मनइंद्रियाशी तादात्म्य तुटता । योग घडे ॥१६२॥
मनाचे मनपण संपता । इंद्रियांसी अनासक्त होता । प्रकटते ती आत्मसत्ता । आपोआप ॥१६३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मग वैराग्य ते प्रकटते । विवेकाची भाषा उमटते । अनुभवून आत्मतत्त्व ते । तो मुक्त होई ॥१६४॥

पावण्या हे ज्ञान । जा तू ज्ञान्यासी शरण । विचारून ते प्रश्न । व्हावे ज्ञानी ॥१६५॥

ज्ञानी ज्ञानाचे भांडार । उपदेशतसे ते सार । सोडून सर्व असार । ज्ञानी व्हावे ॥१६६॥

सत्संगी ते रमणे । मनइंद्रियासी तादात्म्य तुटणे । अहंभाव तो निरसणे । सूत्र अर्जुना ॥१६७॥

सार ते ऐकणे । आंतरमनी सार अनुभवणे । घडे निष्काम मग होणे । अनुभवता सार ॥१६८॥

जयाचे उपदेशाकारणे । मनइंद्रियांठायी निरसणे । मग ब्रह्ममय होणे । आपोआप ॥१६९॥

ब्रह्मज्ञान ते होता । संपते पृथक अहंकारता । स्वत:ची ती विश्वात्मकता । अनुभवा येते ॥१७०॥

ऐसे स्वरूपज्ञान होता । संपते मोह अज्ञानता । अज्ञान ते संपता । दु:ख संपे ॥१७१॥

जरी तू पापाचे आगर । वा भ्रांतीचा तो सागर । अथवा मोहाचा डोंगर । अर्जुना तू ॥१७२॥

पाप भ्रांती जाईल । मोह तो संपेल । जन्ममरणातून सुटशील । ज्ञान होता ॥१७३॥

हे विश्वाचं भासणं । जे आत्मतत्त्वाचच प्रकटन । होता ते स्वरूपज्ञान । न उरे विश्व ॥१७४॥

अति क्षुल्लक तुझे अज्ञान । जे मीपणाचं भासणं । क्षणात विरतसे मीपण । ज्ञान होता ॥१७५॥

प्रलयकालीचे संकट । जे तिन्ही लोकांची लावी वाट । तेथे अभ्राची ती गोष्ट । क्षुल्लक अर्जुना ॥१७६॥

वाऱ्याने जो पसरतो । नि पाण्याने पेटतो । तो समुद्रअग्नी का विझतो । तृण काष्ठानी कधी ॥१७७॥

हे जसे न घडते । तैसे अज्ञान नच उरते । जेधवा आत्मज्ञान ते । प्रकटते अर्जुना ॥१७८॥

प्राप्त होता या आत्मज्ञाना । जया नाही दुजी तुलना । वैश्विक जी चेतना । तेचि ज्ञान ॥१७९॥

सूर्याची ती बरोबरी । कधी प्रतिबिंब का करी । सापडते का कधी करी । आकाश अर्जुना ॥१८०॥

जाणण्या पृथ्वीच्या वजना । जर मिळे तराजू अर्जुना । तरच या ज्ञाना । तुलना शक्य ॥१८१॥

ऐसे स्पष्टपणे जाणता । प्रकटते ती निर्धारता । ज्ञानाची ही पवित्रता । तुलनातीत ॥१८२॥

जर अमृताची चव पुससी । तर अमृत तुलना अमृतासी । तैसे ज्ञान तुलना ज्ञानासी । केवळ अर्जुना ॥१८३॥

आता अधिक ते बोलणे । ते वायाची वेळ दवडणे । मग पार्थ काय म्हणे । ऐकू आता ॥१८४॥

कैसे प्राप्त व्हावे या ज्ञाना । प्रश्न पडला होता अर्जुना । तो विचारला श्रीकृष्णा । त्याने बघा ॥१८५॥

मग म्हणाला भगवंत । ऐक देऊन सारे चित्त । ज्ञानाचे ते गुपित । सांगतो तुजला ॥१८६॥

ज्याला आत्मज्ञानाची कळकळ । विटला जो मनइंद्रियासी सकळ । तो प्राप्त होई तत्काळ । आत्मज्ञाना ॥१८७॥

जो इंद्रिय अनुभवासी विटला । नि मनासंगे तुटला । तो बघ प्राप्त झाला । या आत्मसुखा ॥१८८॥

तयासीच ते शोधीत । येते हे ज्ञान निश्चित । होणे मन विचाराचा अंत । सूत्र अर्जुना ॥१८९॥

ते ज्ञान अंतरी प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकुर फुटे । मग विस्तार बहू प्रकटे । आत्मबोधाचा ॥१९०॥

मग जे जे पहावे । ते आत्मतत्त्वच दिसावे । विश्व ते आघवे । स्वयेचि झाला ॥१९१॥

जाता मनइंद्रियांच्या पार । प्रकटते आत्मतत्त्व ते अपार । आपलाच अनंत तो विस्तार । अनुभवा येई ॥१९२॥

ज्या जिवाच्या ठायी । आत्मज्ञानाची आवड नाही । तयाचे जगणे तेही । व्यर्थ अर्जुना ॥१९३॥

जसे ओसाड ते घर । वा चेतनाहीन शरीर । तैसा त्याचा जीवन व्यापार । व्यर्थ अर्जुना ॥१९४॥

जरी प्राप्त नसे ज्ञान । परी असावी ज्ञानाची तहान । मग तया आत्मज्ञान । दूर नाही ॥१९५॥

नसता ज्ञानाची कास । प्राप्त न होणे आत्मज्ञानास ।मग अखंड दु:खाचा वास । जीवनी त्याच्या ॥१९६॥

अमृत समोर असून । जर न केले त्याचे सेवन । मग ते अमरपण । प्राप्त नाही ॥१९७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ज्ञानाची आवड नसणे । मनइंद्रियांसी आसक्त होणे । मग जन्ममरणी भटकणे । आपोआप ॥१९८॥
ज्ञानासी पारखे होता । संपते सुख समाधानता । चिंता काळजी अशांतता । सोबती त्याचे ॥१९९॥
नाग दंश होणे । मग कडुनिंब गोड लागणे । तैसे अहिता हित समजणे । घडे तेथे ॥२००॥
खरे खोटे न पाही । योग्य अयोग्याची जाण नाही । मग स्वकल्याणाठायी । अंधत्व अर्जुना ॥२०१॥
रात्र दिवसातील फरक । जन्मांधास नाही ठाऊक । तैसी ती अज्ञानाची काळीक । दुर्दैव अर्जुना ॥२०२॥
म्हणून भ्रमाहून थोर । आणिक पाप नाही घोर । दु:ख अशांतीचा वावर । अखंड तेथे ॥२०३॥
ऐशा या भ्रमा ओळखणे । तेचि ज्ञानाचे प्रकटणे । त्या अज्ञाना कारणे । भ्रम अर्जुना ॥२०४॥
अज्ञान गडद होता । मनी वाढते संशय भ्रमता । मग कल्याणाचा मार्ग सर्वथा । दिसेचना ॥२०५॥
अज्ञान भ्रम वाढता । वाढते ती अहंकारता । वाढणे ती स्वकेंद्रितता । दु:ख अर्जुना ॥२०६॥
ऐसे थोर जरी अज्ञान । करावे ज्ञानशस्त्रे त्याचे खंडन । मग घडे ते कल्याण । आपसूक अर्जुना ॥२०७॥
ज्ञान ते प्राप्त होता । संपते ती अहंकारता । भ्रम दु:ख अशांतता । दूर होई ॥२०८॥
याकारणे तू पार्था । जागून त्वरित आता । संपू दे भ्रम अज्ञानता । अंतरातील ॥२०९॥
ऐसा सर्वज्ञ जाणता । भगवान कृष्ण ज्ञानदाता । म्हणे अर्जुनासी आता । ऐक ज्ञान ॥२१०॥
कृष्णाचा तो उपदेश ऐकून । मग प्रश्न विचारेल अर्जुन । संधीचा फायदा घेऊन । होईल ज्ञानी ॥२११॥
मग होईल ज्ञानाची उत्पत्ती । जी आत्मतत्त्वाची संपत्ती । येता ब्रह्मभावाची प्रचीती । मुक्ती घडे ॥२१२॥
ऐशा त्या ज्ञानावरुनी । करता मनइंद्रियाची ओवाळणी । घडे आत्मतत्त्वाची उभारणी । अंतरामाजी ॥२१३॥
ते आत्मतत्त्वच आता प्रकटेल । घेऊन मराठीचे ते बोल । जे समुद्राहूनही खोल । अर्थपूर्ण ॥२१४॥
जैसे बिंब जरी मुठी ऐवढे । परि व्यापे त्रैलोक्य केवढे । तैसे जाऊन शब्दापलीकडे । अवधान द्यावे ॥२१५॥
कल्पवृक्षाखाली बसता । कामनांची होते पूर्तता । तैसीच प्रकटते व्यापकता । अवधानामाजी ॥२१६॥
हे असो काय म्हणावे । ज्ञानी जाणती स्वानुभवे । संपूर्ण अवधान ते द्यावे । आता तुम्ही ॥२१७॥
अवधान ते देता । मन विचारांची होते सांगता । मग प्रकटते ब्रह्ममयता । आपोआप ॥२१८॥
आधीच साखर ती गोड । मिळता औषधाची जोड । मग आत्मतत्त्वाचे कवाड । उघडेच असे ॥२१९॥
मलयगिरीचा मृदु सुगंध । तया अमृताचा स्वाद । त्यात प्रकटणे ब्रह्मनाद । ती मुक्ती अर्जुना ॥२२०॥
तैसे शब्द ते जाणता । येते आंतरमनी शांतता । मग आत्मतत्त्वा अनुभवता । मुक्ती घडे ॥२२१॥
तैसे घडो या कथेचे ऐकणे । ऐकताच मग मुक्त होणे । अज्ञान दु:ख संपणे । क्षणार्धात ॥२२२॥
जर मंत्राने वैरी मरे । मग वायाची बाळगणे हत्यारे । रोग जर जाये साखरे । मग निंब का प्यावा ॥२२३॥
तैसा शरीराचा छळ न करता । इंद्रियासी दु:ख न देता । येथे भेटेल मोक्ष आयता । श्रवणामाजी ॥२२४॥
म्हणून प्रसन्न त्या चित्ताने । गीतार्थ तुम्ही ऐकणे । हे निवृत्तिदासाचे विनवणे । तुम्हामाजी ॥२२५॥

ॐतत्सदिति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानसंन्यासयोगोनाम चतुर्थोऽध्याय: ॥४॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

## ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पाडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०